# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.02.2026** **वारःसोमवार**

---

- 'परीक्षा पे चर्चा २०२६' च्या दुसऱ्या भागात पंतप्रधान देशभरातील विद्यार्थ्यांशी आज साधणार संवाद
- भारत भेटीवर आलेले सेशेल्सचे राष्ट्रपति डॉक्टर पॅट्रीक हर्मिनी यांचं नवी दिल्लीत आगमन
- जपानच्या पंतप्रधानपदी सानाई ताकाईची यांची निवड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं अभिनंदन
- राष्ट्रीय सुरक्षा आणि कायदा अंमलबजावणीच्या मुद्द्यांवर भारत आणि कॅनडाकडून सहमती
- आणि
- टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत इंग्लंडचा नेपाळ संघावर चार धावांनी विजय

**<u>परीक्षापेचर्चा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 'परीक्षा पे चर्चा २०२६' च्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात देशभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. हा कार्यक्रम, सकाळी १० वाजता, विविध प्रसार माध्यमांतून प्रसारित होणार आहे. दहावी, बारावीच्या परीक्षा जवळ येत असल्यानं, परीक्षेचा ताण, परीक्षेची तयारी, वेळ व्यवस्थापन तसंच विद्यार्थ्यांनी या परीक्षांना आत्मविश्वासानं कसं सामोरं जावं यावर या कार्यक्रमात पंतप्रधान विद्यार्थ्यांशी चर्चा करतील. या भागात तामिळनाडूतील कोइम्बतूर, छत्तीसगडमधील रायपूर, गुजरातमधील देव मोगरा आणि आसाममधील गुवाहाटी येथील परीक्षा योद्धे सहभागी होतील असं पंतप्रधानांनी समाजमध्यमांवरील संदेशांत म्हंटलं. आहे. आत्मविश्वास, सकारात्मकता आणि सर्वसमावेशक कल्याण साधून, परीक्षा एक उत्सव म्हणून साजरा करण्याचा दृष्टिकोण प्रदान करणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**<u>पंतप्रधान-सेशेल्स</u>**

पाच दिवसांच्या भारत भेटीवर आलेले सेशेल्सचे राष्ट्रपति डॉक्टर पॅट्रीक हर्मिनी यांचं काल नवी दिल्लीत आगमन झालं. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पॅट्रीक हर्मिनी यांच्यात आज नवी दिल्लीत द्विपक्षीय बैठक होणार आहे. या बैठकी, उभय नेत्यांमध्ये परस्पर हिताच्या द्विपक्षीय, क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्यांवर चर्चा होणं अपेक्षित आहे. डॉक्टर हर्मिनी आज संध्याकाळी राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांची देखील भेट घेणार आहेत. दरम्यांन, नवी दिल्लीत आगमन होण्यापूर्वी काल, सेशेल्सचे राष्ट्रपति डॉक्टर पॅट्रीक हर्मिनी आणि त्यांच्याबरोबर आलेल्या शिष्टमंडळाचं, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत स्वागत केलं. या

वर्षी सेशेल्सच्या स्वातंत्र्याच्या ५० व्या वर्धापनदिनानिमित्त, तसंच, भारत आणि सेशेल्स यांच्यातील राजनैतिक संबंधांच्या ५० व्या वर्षाच्या निमित्ताने मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उभय नेत्यांमध्ये, विविध विषयांवर, विशेषतः बंदर आधारित विकास, किनारी व्यवस्थापन आणि महाराष्ट्र आणि सेशेल्स यांच्यातील सहकार्यवृद्धीच्या संभाव्य संधींवर चर्चा झाली.

**पंतप्रधान-मलेशियादौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी काल, दोन दिवसांच्या मलेशिया दौऱ्यावरून मायदेशी परतले. या दौऱ्यात, पंतप्रधानांनी, मलेशियाचे पंतप्रधान अन्वर ईब्राहीम यांच्याशी संरक्षण, ऊर्जा, पर्यटन, सेमी कंडक्टर, व्यापार आदी क्षेत्रांतील सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा केली. सागरी शेजारी म्हणून भारत आणि मलेशियामध्ये एक विशेष नातं असल्याची भावना पंतप्रधानांनी एका संयुक्त निवेदनात व्यक्त केली. दहशतवादाविरोधातलं भारताचं धोरण स्पष्ट असून, दहशतवादाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही असं पंतप्रधानांनी स्पष्ट केलं.

**पंतप्रधान-जपानपंतप्रधान**

जपानच्या नवनिर्वाचित पंतप्रधान सानाई ताकाईची यांचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे. नुकत्याच झेलेल्या जपानच्या प्रतिनिधीगृहाच्या निवडणुकीत त्यांनी विजय मिळवला. आपल्या समाजमध्यमांवरील संदेशांत, उभय देशांमधे असलेली विशेष सामरिक आणि जागतिक भागीदारी, जागतिक शांतता, स्थिरता आणि समृद्धी वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते असं नमूद करत, ताकाइची यांच्या सक्षम नेतृत्वामुळे भारत-जपान मैत्री नव्या उंचीवर पोहोचेल असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

**भारत-कॅनडा-सुरक्षा**

भारत आणि कॅनडाने राष्ट्रीय सुरक्षा आणि कायदा अंमलबजावणीच्या मुद्द्यांवर उभय सहकार्यासाठी, संयुक्त कृती आराखडा विकसित करण्यास सहमती दर्शविली आहे. शनिवारी ओटावा येथे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि कॅनडाच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार नॅथॅली ड्रोइन यांच्यात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीत, दोन्ही बाजूंनी सायबरसुरक्षा धोरणावर सहकार्य औपचारिक करण्यावर आणि सायबरसुरक्षा समस्यांवर माहितीची देवाणघेवाण करण्यावरही सहमती दर्शवली. या नुसार, भारत आणि कॅनडा, सुरक्षा आणि कायद्याची अंमलबजावणी करणारे आपापले संपर्क अधिकारी नियुक्त करतील. यामुळे दोन्ही देशादरम्यान आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी जाळे, अंमली पदार्थांची तस्करी यांसारख्या मुद्यांवर वेळेवर माहितीची देवाणघेवाण करणं शक्य होणार आहे. डोभाल यांनी कॅनडाचे सार्वजनिक सुरक्षा मंत्री गॅरी आनंदसंगरी यांचीही भेट घेतली.

**अमितशाह-रायपूर**

भाजपच्या विचारसरणी-आधारित शासनामुळे, एकेकाळी मागास मानल्या जाणाऱ्या छत्तीसगडसह अनेक राज्यांमध्ये परिवर्तन झालं आहे असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. नवा रायपूर

इथं काल आयोजित करण्यात आलेल्या, "छत्तीसगड @ २५: दृष्टिकोन परिवर्तन : सुरक्षा, समृद्धी आणि स्थिरता" या परिषदेच्या समारोप सत्रात ते बोलत होते. या दौऱ्यात शहा यांनी रायपूरमध्ये नक्षलविरोधी कारवाया आणि विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी दोन उच्चस्तरीय बैठका घेतल्या. नक्षलवाद्यांविरोधात राबावलेली सुरक्षा-केंद्रित रणनीती, पायाभूत सुविधांचं बळकटीकरण, नक्षलवाद्यांचं आर्थिक खच्चीकरण, आणि आत्मसमर्पण धोरणामुळे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत, असं शहा यावेळी म्हणाले. या वर्षी ३१ मार्चपूर्वी नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात आणला जाईल असा पुनरुच्चार शहा यांनी केला.

**<u>भारत-अमेरिकाकरार</u>**

आगामी पांच वर्षांमध्ये अमेरिकेकडून 500 अब्ज डॉलर्स किंमतीच्या वस्तु विकत घेण्यात कोणतीही अडचण येणार नाही असं केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी म्हंटलं आहे. भारत-अमेरिका कराराच्या पार्श्वभूमीवर, काल वृत्तसंस्थेला दिलेल्या  मुलाखतीत ते बोलत होते. विमानं आणि त्यांचे सुटे भाग, मौल्यवान खनिजं, तंत्रज्ञान, दगडी कोळसा आदि वस्तु अमेरिकेकडून खरेदी करण्याची तयारी या करारात भारताने दर्शवली असल्याचं गोयल यांनी सांगितलं.

दरम्यान भारत-अमेरिका व्यापार करारामुळे भारतीय शेतकऱ्यांचं नुकसान होईल, अशा आशयाचे संदेश काही समाजमध्यमांवर प्रसारित करण्यात येत आहेत. हे संदेश चुकीचे आणि दिशाभूल करणारे असल्याचं सांगत सरकारने म्हटलं आहे. पत्र सूचना कार्यालयाच्या तथ्य तपासणी विभागाने ही माहिती दिली आहे. हा दावा दिशाभूल करणारा असून, कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे तयार करण्यात आलेला हा दृकसंदेश गोंधळ पसरवण्याच्या उद्देशाने प्रसारित केला जात आहे, असं विभागाने म्हंटलं आहे. अचूक माहितीसाठी नागरिकांनी नेहमी अधिकृत स्रोतांवर अवलंबून राहावे, असे आवाहन पिआयबीने केले आहे.

भारत-अमेरिका व्यापार करारामध्ये देशाच्या कृषी आणि दुग्धव्यवसाय क्षेत्राशी कोणतीही तडजोड करण्यात आलेली नाही. सर्व प्रमुख पिके, प्रमुख धान्ये, फळे आणि दुग्धजन्य पदार्थ संरक्षित आहेत आणि शेतकऱ्यांचे नुकसान होईल अशा कोणत्याही क्षेत्रात बाजारपेठ खुली करण्यात आलेली नाही, असेही सरकारने स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, अखिल भारतीय व्यापारी महासंघ अर्थात सी ए आय टी ने भारत-अमेरिका व्यापार काराराचं स्वागत केलं आहे. हा व्यापार करार देशांतील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रांसाठी मोठं वरदान ठरेल, असं महासंघाचे सरचिटणीस प्रवीण खांडेलवाल यांनी एका निवेदनात म्हंटलं आहे.

**<u>प्राप्तीकरनियमावली</u>**

केंद्र सरकारनं नागरिक आणि संबंधितांकडून प्राप्तीकर नियमावली २०२६ बाबतच्यासूचना मागवल्या आहेत. प्राप्तीकर विभागाच्या अधिकृत पोर्टलवर येत्या २२ तारखेपर्यंत या सूचना नोंदवता येतील. ही नियमावली नागरिकांसाठी खुली करण्यात आली आहे. पारदर्शकतेला चालना देण्यासाठी आणि निर्णय प्रक्रियेतील लोकसहभाग या हेतूनं नागरिकांकडून सूचना मागवण्यात आल्याचीं माहिति प्राप्तीकर कार्यालयानं दिली आहे.

**<u>निवडणूकआयोगपश्चिमबंगाल</u>**

पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या मतदार याद्यांचा विशेष व्यापक पुनरिक्षणासाठी कायम रहिवासी प्रमाणपत्र अर्थात डोमिसाईल, ग्राह्य कागदपत्रांमधील एक प्रमाणपत्र आहे असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. केवळ मान्यताप्राप्त अधिकाऱ्यांनी दिलेलं डोमिसाईलच अधिकृत मानावं असे आदेश आयोगानं पश्चिम बंगालमधल्या मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या सहायकांना दिले आहेत. जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि कोलकत्याचे जिल्हाधिकारी यांचा मान्यताप्राप्त अधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे.

**<u>वैष्णव-रेल्वेगाड्या</u>**

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते काल पश्चिम बंगाल मधील सिऊरी रोड आणि कुमारपूर रोड येथील उड्डाणपूलांचं दूरदृश्य प्राणलीच्या माध्यमातून उद्घाटन करण्यात आलं. त्याचबरोबर, वैष्णव यांनी आसनसोल-बोकारो दरम्यानच्या रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवला. हे प्रकल्प राज्यातील रेल्वे पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी तसंच सुरक्षितता वाढवण्यासाठी  एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, या वर्षी पश्चिम बंगालमधील रेल्वेसाठी १४ हजार २शे ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>महाराष्ट्र-मतमोजणी</u>**

महाराष्ट्रातील 12 जिल्हा परिषदा आणि 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांची मतमोजणी आज होणार आहे. सकाळी 10 वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. मतमोजणीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने सूरक्षेसह सर्व व्यवस्था तैनात केल्या आहेत.

संतोषचषक

सेवादलाने 79वी राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद अर्थात संतोष ट्रॉफी जिंकली आहे. काल आसाममधील ढाकूआखाना मैदानावर झालेल्या मैदानात सेवादल संघाने केरळ संघावर 1 – 0 अशी मात केली. सेवादलाने आठव्यांदा हे अजिंक्यपद पटकावलं आहे.

क्रिकेट-**<u>टी20विश्वचषक</u>**

टी-20 क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, काल कोलंबोत झालेल्या 'ब' गटाच्या सामन्यात श्रीलंका संघाने आयर्लंड संघावर 20 धावांनी मात केली. मुंबईत 'क' गटात खेळल्या गेलेल्या सामन्यात इंग्लंड संघाने नेपाळला चार धावांनी पराभूत केलं.

तर, चेन्नईत झालेल्या ‘ड’ गटाच्या सामन्यात न्यूझीलंड संघाने अफगाणिस्तान संघाचा चार गडी राखून पराभव केला.

या स्पर्धेत आज, कोलकात्यात झिम्बाब्वे विरुद्ध ओमान आणि अहमदाबादमध्ये दक्षिण आफ्रिका विरुद्ध कॅनडा असे सामने होणार आहेत.

## **याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**